# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ०४ जुलै, २०२५ / आषाढ १३, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल मंत्री | |
| (२) | वने मंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | |
| (४) | कृषी मंत्री | |
| (५) | सामाजिक न्याय मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (६) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री | |
| (७) | मदत व पुनर्वसन मंत्री | |
| (८) | मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | |

------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

------------------------------------

**वसई (जि.पालघर) येथील अनेक ठिकाणी तिवराची झाडे नष्ट करुन होत असलेले अतिक्रमण**

**(१) * ७२५८ श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालोंडे, गास व जुचंद्र (ता.वसई, जि.पालघर) या भागातील शेकडो एकर शासकीय भूखंडावरील कांदळवनाची भूमाफियांकडून कत्तल करुन त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वसई येथील सुरुची बागेजवळील सर्वे क्र.६९ येथील शासकीय खाजण जागेतील तिवरांची झाडे नष्ट करुन त्या जागेवर अतिक्रमण करण्यासाठी भूमाफियांनी पाण्यात विषारी रासायनिक द्रव्य टाकले त्याचे पंचनामे सादर केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे प्रकार सन २०१२ पासून होत असून बाधित क्षेत्राची शासकीय दप्तरी नोंद नसल्याने पर्यावरणाचे मोठे नुकसान होऊन समुद्री जीवनावर विपरित परिणाम होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात वन विभाग, पोलीस विभाग, वसई-विरार महानगरपालिका आणि खारभूमी विभाग यांच्याकडे वारंवार तक्रारी करुनही यावर कोणतीही कार्यवाही न करता या अवैध प्रकारांकडे संबंधित विभागाकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची दखल घेवून अवैधरित्या होत असलेली कांदळवनाची कत्तल रोखण्याकरिता संबंधित संरक्षण समिती कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषी भूमाफिया व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) (५) व (६) पालघर जिल्ह्यातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संनियत्रण समिती दिनांक १५.११.२०१८ अन्वये गठीत करण्यात आली आहे.

वसई तालुक्यातील कांदळवन समिती मार्फत वेळोवेळी पाहणी करण्यात येत असून समितीकडे प्राप्त होणाऱ्या खाजगी व शासकीय जमिनीवरील कांदळवन नुकसानीच्या तक्रारी बाबत तक्रारींचे निवारण करण्याची कार्यवाही तत्परतेने करण्यात येत आहे. आतापर्यंत शासकीय खाजगी जागेवरील कांदळवनाच्या नुकसानीबाबत १९ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

-----------------

## रत्नागिरी येथे वन विभागातर्फे आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यशाळेत झालेला गैरव्यवहार

**(२) * ७३११ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी येथे कांदळवन व वनविभागातर्फे एका आलिशान हॉटेलमध्ये कांदळवन प्रशिक्षण कार्यशाळेचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याकरिता पोलीसदल, कस्टम, कोस्टगार्ड, मत्स्यविभाग, मच्छीमार सोसायटी व सुरक्षादल कर्मचारी अशा केवळ १३० जणांच्या उपस्थितीत कार्यशाळेसाठी एकूण रुपये ७.५० लाख खर्च करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कार्यशाळेच्या प्रशिक्षणामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने याबाबत मा.पालक मंत्री, रत्नागिरी यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) कांदळवन व त्यावर अवलंबून परिसंस्थेचे फायदे-तोटे इत्यादी बाबींच्या अनुषंगाने "Marine Animal Stranding Response" या विषयावर कांदळवन प्रतिष्ठान व मे.बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११/०२/२०२५ रोजी रत्नागिरी येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेस विविध क्षेत्रातील तज्ञ, स्थानिक मच्छीमार, मासेमारी सहकारी संस्था, स्वयंसेवी संस्था, कोस्टल गार्ड, नेव्ही, पोलीस विभाग, कस्टम विभाग, पत्रकार, कांदळवन कक्ष, मुंबई, रत्नागिरी, रायगड, सिंधुदूर्ग, मे.बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे पदाधिकारी, कर्मचारी असे विविध क्षेत्रातील एकूण १३५ जण उपस्थित होते.

प्रस्तुत कार्यशाळेकरिता सुसज्ज सभागृह व इतर अत्याधुनिक सुविधा असलेल्या "सावंत पॅलेस, रत्नागिरी"

यांचे दरपत्रक कमीतकमी दराचे असल्याने त्यांना मंजूरी देऊन निवड करण्यात आली. प्रस्तुत कार्यशाळेसाठी रु.७,५१,३७०/- इतका खर्च झाला असून त्यामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोरिवली येथील मुंबई खादी ग्रामोद्योग असोसिएशन उर्फ कोरा केंद्र या खाजगी संस्थेला दिलेल्या भूखंडाचा गैरवापर केल्याबाबत**

**(३) * ७८२२ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरिवली येथील मुंबई खादी ग्रामोद्योग असोसिएशन उर्फ कोरा केंद्र या खाजगी संस्थेला मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी खादी ग्रामोद्योगाचा प्रसार करण्याच्या अटीवर रु.५१ कोटी शुल्क आकारुन शासकीय भूखंड देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३९ एकर १७ गुंठेपैकी ३.८४ एकर भूखंड संस्थेच्या नावावर करण्यास मा.महसूल मंत्री यांनी मान्यता दिल्यानंतर सदर संस्थेने हा भूखंड सुमारे ५३९ कोटी रुपयांस विक्री करुन यात मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेने उक्त भूखंडाचा शाही विवाह सोहळे, गरबा नाईट, खाजगी पार्ट्या आदिंसाठी गैरवापर करुन अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास येऊनही अद्याप शासनाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रस्तुत प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी दिलेले आदेश मा.महसूल मंत्री महोदयांनी रद्द केले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन भूखंडाचा विक्री व्यवहार रद्द करण्यासह सदर खाजगी संस्था व यातील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही, हे खरे नाही. सदर संस्थेस सन १९४७ ते सन १९५६ या दरम्यान कब्जेहक्काची रक्कम वसूल करून वर्ग-२ धारणाधिकारावर जमीन मंजूर केली होती. तथापि, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार रुपये ५१,६९,९२,९९५.००/- रक्कम वसूल करून जमीन वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करून देण्यात आली आहे, हे खरे आहे.
(२) विषयांकीत जमीन भोगवटादार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरण करणेबाबत शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग दिनांक २१/०९/२०२३ व शुध्दीपत्रक दिनांक १४/१०/२०२४ अन्वये पूर्वमान्यता देण्यात आली होती. त्यानुसार मौजे- बोरीवली-TP०३, अंतिम भूखंड क्रमांक - ६१२/अ, ६११, ६१२, ६१४ या मिळकतींचे रुपये ५१,६९,९२,९९५.००/- अधिमूल्य घेऊन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाकडून भोगवटादार वर्ग-१ रुपांतरण आदेश पारीत केले आहेत.

सह दुय्यम निबंधक वर्ग-२, मुंबई यांचेकडे उपरोक्त ४ भूखंडांचा करारनामा दस्त मुंबई-२३/५०५९/२०२५ दिनांक-३०/०३/२०२५ रोजी नोंदणीकृत करणेत आला असून सदर दस्तात मोबदला रक्कम रुपये ५३९,२५,००,०००/- व बाजार मुल्य रुपये २७१,०४,२७,०००/- इतके नमूद केले आहे.

(३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

शर्तभंग प्रकरणी संस्थेस प्रदान जमीन शासन जमा करणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने दिनांक २७/१२/२०१७ चे आदेश व अपर आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक १९/११/२०१८ चे आदेश पारित केले होते.

तथापि, मा.मंत्री (महसूल) यांनी फेरतपासणी प्रकरणात दिनांक २८/०६/२०२३ चे आदेशान्वये उपरोक्त दोन्ही आदेश रद्द करून वाद मिळकतीचा ताबा १५ दिवसांत अर्जदार संस्थेस देणेबाबत व संस्थेचे नाव वाद मिळकतीस पुन्हा लावणेबाबत आदेशित केले आहे.

(५) जमीन वर्ग-१ मध्ये रुपांतरीत झाल्यानंतर सदर संस्था ही जमीन शासनाच्या परवानगीशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीस / संस्थेस कोणतीही रक्कम आकारून विक्री करणेस सक्षम आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात संत्रा लागवड क्षेत्रात फायटोप्थोरा या रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याबाबत

**(४) * ८५६७ श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे दीड लाख हेक्टरवर संत्रा लागवड क्षेत्र असून त्यापैकी सर्वाधिक एक लाख हेक्टर क्षेत्र एका अमरावती जिल्ह्यात असून उर्वरित २५ हजार हेक्टर महाराष्ट्रात तर २५ हजार हेक्टर नागपूर जिल्ह्यात लागवड होत असून त्याप्रमाणे संत्रा लागवड क्षेत्राचे वर्गीकरण केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संत्रापट्ट्यात यंदा फायटोप्थोराचा प्रादुर्भाव झाल्याने प्रादुर्भावग्रस्त संत्र्याच्या बागांमध्ये अन्नद्रव्याचा पुरवठा प्रभावित होत असल्यामुळे झाडे सुकून जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूरसह अमरावती जिल्ह्यात ही समस्या असून चांदूरबाजारसह जिल्ह्याच्या विविध भागांत ४० टक्के बागांमधील झाडे फायटोप्थोराच्या परिणामामुळे उत्पादनक्षम राहत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासह संत्रा पिकावरील फायटोप्थोराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कृषी विद्यापीठ तसेच अन्य तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सन २०२४-२५ या वर्षात फायटोप्थोरा या रोगाचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर झाला असल्याचे आढळून आलेले नाही. तसेच फायटोप्थोराच्या प्रादुर्भावामुळे संत्र्यांच्या बागांना अन्नद्रव्याचा पुरवठा प्रभावित होत असल्यामुळे झाडे वाळत असल्याचे व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे अशी कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौ.संगमेश्वर (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील भूमाफियांनी सिटी सर्वे क्र.१४४ अ या जमिनीची बिनशेती परवानगी न घेता शासनाची केलेली फसवणूक**

**(५) * ९११८ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.संगमेश्वर (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील सिटी सर्वे नंबर ११४ अ या जमिनीची बिनशेती परवानगी न घेता, शासकीय ले-आऊट न करता, नजराणा न भरता, तुकडेबंदी कायदा असतानाही या जमीनीचे १६ तुकडे करून सदर जमीन खरेदीखतात बैल गोठ्यांकरीता खरेदी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालेगावातील स्टॅम्प वेंडर जाकीर व आरीफ अब्दुल लतीफ व त्यांच्या साथीदारांनी सदर जमिनीवर रहिवासी बांधकाम केले व त्याची विक्री करून खरेदीदारांची व शासनाची फसवणूक केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, MRTP ॲक्ट कलम ३६४ प्रमाणे महानगरपालिका हद्दीतील बैलगोठ्यांची नोंद महानगरपालिकेत असणे कायद्याने बंधनकारक असताना १६०० बैलगोठ्यांची नोंद महानगरपालिकेत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी अनधिकृत बांधकामे झाली असून सदर क्षेत्रातील पुरक्षेत्रावर (फ्लड लाईनवर) भूमाफियाने बेकायदेशीर पेट्रोल पंप उभारला असून श्रीमती वैशाली पंडीत धांडे यांच्या मालकीची शेती परस्पर रहिवासी कारणासाठी खरेदी विक्री करून श्रीमती धांडे व शासनाची कोट्यवधी रूपयांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनधिकृत इमारतींचे बांधकाम करणाऱ्या जाकीर व आरीफ यांच्या गैरव्यवहाराची शासनाने उच्चस्तरिय चौकशी समिती नेमून शासनाचा बुडविलेला कोट्यवधी रूपयांचा महसूल वसूल करणे तसेच भूमाफियांच्या अवैध व बेनामी संपत्तीची चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाची फसवणूक करणाऱ्या उपरोक्त दोषी भूमाफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सह जिल्हा निबंधक वर्ग-१ नाशिक यांनी अशी बाब निर्दशनास आलेली नाही असे कळविलेले आहे.

(३) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मध्ये कलम ३६४ अंतर्भूत नाही. सर्वे नं.११४/अ हा मालेगाव शहरासाठी मंजूर विकास योजनेत ग्रीन बेल्ट दर्शविलेला आहे. त्यामुळे सदर क्षेत्राचा अभिन्यास /उपविभाजन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही तसेच, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांनी बैलगोठा या वापराकरीता कोणतीही बांधंकाम परवानगी दिलेली नाही.

(४) उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांनी दिनांक १६.३.२०१३ नुसार मौजे संगमेश्वर ता.मालेगांव येथील स.नं.११४/अ या भोगवटादार वर्ग-२ जमिनीची मौजे गुगुळवाड, ता.मालेगांव येथील ग.नं.२५३ या भोगवटादार वर्ग-१ जमीनी सोबत अदलाबदलीबाबत आदेश पारित केला. त्यानुसार मौजे संगमेश्वर ता. मालेगांव येथील स.नं.११४/अ ही नविन अविभाज्य शर्तीवर असलेली मिळकत भोगवटादार वर्ग-१ करण्यात आली. तत्कालिन तहसिलदार मालेगांव यांच्या दिनांक १.६.२०१३ रोजीच्या आदेशान्वये सदर गट नं.११४/अ या शेतजमीनीचे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अन्वये वाटप करण्यात आले असून सदर गट नं.११४/अ चे १ ते १६ असे उपविभाग तयार करण्यात आले.

मौजे संगमेश्वर येथील ग.नं.११४/अ/१ क्षेत्र ३२००.०० चौ.मी. या मिळकतीवर पेट्रोल पंपासाठी मालेगाव महानगरपालिका यांच्याकडून दिनांक ०९/११/२०२१ अन्वये परवानगी दिलेली आहे. तदनंतर तत्कालीन तहसिलदार यांनी ४२ ब अंतर्गत दिनांक २०.१०.२०२१ रोजी वाणिज्य (पेट्रोल पंपासाठी) सनद निर्गमित केली असून त्यातील अटीनुसार सदरच्या जमीनीचा बिनशेती वापरासाठी अर्जदार यांनी त्यांच्या मिळकतीच्या चालु बाजारभावाप्रमाणे येणारी ५०% नजराणा रक्कम रुपये ३८,२१,६००/- इतकी रक्कम दिनांक १२/१०/२०२१ रोजी शासन खाती भरणा केली आहे. तसेच जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडील दिनांक ०४/०७/२०२२ रोजी पेट्रोल पंपासाठी No objection certificate (See rule १४४) निर्गमित केलेली आहे.

मौजे संगमेश्वर येथील ग.नं.११४/अ/७ क्षेत्र ०.२० हे. आर ही मिळकत श्री.दिपक शामराव म्हसदे व श्रीमती वैशाली पंडीत धांडे यांचे नावावर झाली. सदर गटाचे हस्तांतरण नोंदणीकृत खरेदी खताव्दारे फैज अहमद अशफाक अहमद व अनिस अहमद जलीस अहमद यांचेकडे झालेले असून रू.१,९९,८००/-इतके मुद्रांक शुल्क व रू.३०,०००/- इतके नोंदणी शुल्काचा भरणा करण्यात आलेला आहे.

(५) निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(६) उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांचे दिनांक १६.३.२०१३ रोजीचे जमीन अदलाबदलीचे आदेश हे शासन परिपत्रक दिनांक ५ मार्च, २००७ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतुदींशी विसंगत असल्याने सदरचे आदेश पुनरिक्षणात घेण्यात आले. त्यास अनुसरून अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांचे दिनांक २४.२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी मालेगाव यांच्या दिनांक १३.६.२०१३ रोजीचे शेत जमीन अदला बदली संदर्भातील आदेश व त्या आदेशान्वये घेण्यात आलेला फेरफार क्र.२७१८० रद्द केला आहे.

अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांचे दिनांक २४.२.२०२३ रोजीच्या आदेशाविरूध्द मोहम्मद आरिफ अब्दुल लतीफ व इतर २ यांनी अपर विभागीय आयुक्त नाशिक यांच्याकडे दाखल केलेल्या अपिलावर अपर विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक १९/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी, मालेगाव यांचेकडील दिनांक २४/०२/२०२३ रोजीचा आदेश कायम केला असून सदर प्रकरणी पुढील कार्यवाही उपविभागीय अधिकारी, मालेगाव यांचेकडे सुरु आहे.

-----------------

## राज्य शासनाच्या आदिवासी विभागातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदीच्या नियमबाह्य निविदा काढल्याबाबत

**(६) * ८१८७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आदिवासी विभागातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे गणवेश व नाइट ड्रेस खरेदी निविदा प्रक्रिया न राबविता नियमांचे उल्लघंन करुन खरेदी दर करारानुसार सुमारे ११४ कोटी रुपयांचा गणवेश खरेदीचा आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार गैरव्यवहार केलेल्या संबंधीत दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.अशोक उईके :** (१), (२) व (३) शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यासाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शालेय गणवेश, पी.टी. ड्रेस, नाईट ड्रेस हे साहित्य उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १.१२.२०१६

रोजीच्या खरेदी धोरण व उद्योग संचालनालयाने दिनांक २७.०९.२०२३ रोजीच्या आदेशान्वये केलेल्या दर निश्चितीनुसार तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभागाने दिलेल्या अभिप्रायाच्या आधारे रु. १०५,८४,६३,०२९/- इतक्या रकमेच्या खर्चास दिनांक १५ मार्च, २०२४ अन्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शालेय गणवेश, नाईट ड्रेस व पी.टी. ड्रेस या वस्तुंचा पुरवठा करण्यात आलेला आहे. या गणवेश खरेदी व्यवहारामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबड व घनसावंगी (जि.जालना) तालुक्यात पात्र शेतकऱ्यांना अनुदान वितरित करण्याबाबत

**(७) * ७१०७ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.हिकमत उढाण (घनसावंगी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड व घनसावंगी (जि.जालना) तालुक्यात सन २०२२-२०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, पूर व गारपिटीने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून शेतीच्या नुकसानीसाठी सानुग्रह अनुदान म्हणून ११०३ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनुदानाच्या वाटपात ९८३ कोटी रुपयांपैकी सुमारे ५६ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून सदर गैरव्यवहार ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी व कृषी विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने होऊन बोगस लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान वर्ग करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जालना जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाद्वारे विकसित संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून वितरित करण्यात आलेल्या कृषी अनुदानामध्ये अपात्र लाभार्थ्यांना अनुदान वितरित झाल्याचेही माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा अपात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळाल्यामुळे पात्र शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यात अडथळा निर्माण होऊन खरीप हंगामासाठी आवश्यक बि-बियाणे, खते व औषधे खरेदी करण्यात अडचणी निर्माण झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन पात्र शेतकऱ्यांना अनुदान वितरित करण्याबाबत तसेच सदर अनुदान वाटपात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) (२), (३) व (४) जालना जिल्हयासाठी सन २०२२-२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, पूर व गारपिटीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीसाठी सानुग्रह अनुदान म्हणून ५२२.२९ कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले असून अंबड तालुक्यासाठी ११२.६३ कोटी व घनसावंगी तालुक्यासाठी ११.७७ कोटी असे एकूण १२४.४० कोटी मंजुर करण्यात आलेले असून १४५४९ खातेदारांना रु.३४.९७ कोटी इतके अतिरिक्त प्रदान झालेले आहे.

अपात्र लाभार्थ्यांना वितरीत झालेले अनुदान हे पात्र लाभार्थी यांना वितरित झालेल्या अनुदानाव्यतिरिक्त असल्यामुळे तसेच पात्र लाभार्थी यांना अनुदान मिळाले असल्यामुळे पात्र शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी अडचणी निर्माण झाल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) जिल्हास्तरीय चौकशी समितीने दोषी ठरविलेल्या अंबड व घनसावंगी तालुक्यातील २१ ग्राम महसुल अधिकारी/महसुल सहायक/सहायक महसुल अधिकारी यांना निलंबित करण्यात आले आहे.

तत्कालीन तहसिलदार अंबड व घनसावंगी यांचेविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. अन्य तहसिलदार व नायब तहसीलदार यांचे प्रकरणी खुलाश्याचे अवलोकन करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच ३६ ग्राम महसुल अधिकारी / सहायक महसुल अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांचेमार्फत ग्रामपंचायत अधिकारी व जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी जालना यांचे मार्फत कृषि सहायक यांना नोटीस निर्गमित करण्यात आली असून त्यांचे खुलाश्याचे अवलोकन करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(८) * ७०७८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अमोल खताळ (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.अमोल जावळे (रावेर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश वानखडे**

**(तिवसा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात सन २०२४ व २०२५ दरम्यान झालेला अवकाळी पाऊस अतिवृष्टी, वादळी वारा व गारपीटीमुळे मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानीसह शेतकऱ्यांची घरे, शेतमाल, जनावरे, फळबागांचे नुकसान, पिके व फळांवरील रोगांचा प्रादुर्भाव, मच्छिमारांच्या बोटींचे नुकसान तसेच वीजपुरवठाही खंडित झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच काही जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी वीज पडून अनेक व्यक्ती व जनावरांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे राज्य शासनाने १०० दिवसांच्या कृती आराखड्यात समाविष्ट केले असून त्यानुसार नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसान भरपाईपोटी त्यांची देय रक्कम दिनांक ३१ मार्चपर्यंत दिली जाईल असे मा.कृषी मंत्री महोदयांनी आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक ठिकाणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे न होणे, पंचनामे वस्तुनिष्ट नसणे, केवायसी करुनही बँक खात्यात रक्कम जमा न होणे, विज अटकाव यंत्र न बसविणे इ. अनेक कारणास्तव शेतकरी या मदतीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व मच्छिमारांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मदत व पुनर्वसन, मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना तसेच अखिल महाराष्ट्र कृती समितीने मा. मुख्यमंत्री व मा. मत्स्यव्यवसाय मंत्री यांना माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकरी व मच्छिमारांना तात्काळ नुकसान भरपाई देणे, विज प्रतिबंधक यंत्र बसविणे तसेच मृतांच्या वारसांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) (२), (३), (४), (५) व (६) सन २०२४ व २०२५ मध्ये राज्यात अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्यामुळे वीज पडून शेतीपिकांचे तसेच जिवित हानी, आणि मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी २०२४ मधील पंचनाम्याची कार्यवाही पूर्ण होऊन बहुतांश प्रकरणी निधी वाटप करण्यात आलेला आहे. सन २०२५ मधील नुकसानीबाबत पंचनाम्याची कार्यवाही सुरु आहे.

१०० दिवसाच्या कृति आराखड्यानुसार रुपये ३९०० कोटी वाटप करण्याचे उद्दिष्ट होते. त्यानुसार निधी रुपये ३९०० कोटी डिबीटी प्रणालीमार्फत बाधित शेतकऱ्यांना वितरित केलेला आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले मृत व्यक्ती तसेच मृत जनावरांबाबत अनुदान तातडीने व वेळेवर वाटपाकरिता (-) उणे प्राधिकार पत्रावर देयक सादर करण्याची सुविधा शासनाकडून देण्यात आली आहे व काही ठिकाणी अनुदान वाटप केले आहे. तर काही ठिकाणी अनुदान वाटपाबाबत कार्यवाही तहसिल स्तरावर सुरु आहे.

सन २०२४ मध्ये मच्छीमारांच्या झालेल्या नुकसानीसाठी मदत वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे. तर २०२५ मधील नुकसानीबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

E-KYC झालेल्या शेतकऱ्यांना डी.बी.टी. प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्यात येत आहे. काही ठिकाणी DBT प्रणालीवर माहिती क्षेत्रिय यंत्रणेमार्फत भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. प्रलंबित ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही तालुकास्तरावर कॅम्पचे विशेष आयोजन करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

काही शेतकऱ्यांचे बँक खाते आधारकार्ड संलग्न नसल्यामुळे, सामाईक खातेदारांचे अनुदान कोणाच्या खात्यावर जमा करावे याबाबतचे संमतीपत्र दिले नसल्याने, मयत खातेदारांची वारस नोंद झाली नसल्याने तसेच परगावाच्या खातेदारांचे बॅक तपशील, आधारकार्ड इ. माहिती उपलब्ध होत नसल्याने अनुदान वाटपास विलंब होत आहे.

तथापि, याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

| विभाग | विज प्रतिबंधक यंत्र |
|---|---|
| अमरावती | ८६१ |
| छत्रपती संभाजी नगर | ५०२ |

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिका (जि.पालघर) क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बेकायदा माती भराव होत असल्याबाबत

**(९) * ९५२६ श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई – विरार महानगरपालिका (जि.पालघर) क्षेत्रात मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगत व इतर भागात मोठ्या प्रमाणात बेकायदा माती भराव केला जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त महामार्गावरून दररोज गौण खनिज तसेच इमारतींच्या राडा-रोड्याची अवैध वाहतूक सुरू असून महामार्गाच्या आजूबाजूच्या गावातील खाजगी तसेच सरकारी जागेवर मोठ्या प्रमाणात राडा- रोडा व मुरुम टाकला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही ठिकाणी थेट कांदळवन क्षेत्र असलेल्या जागेतही माती भराव करून ती नष्ट केली जाऊन वसईतील खाड्या तसेच नैसर्गिक पाणी वाहण्याचे स्तोत्र बंद होत असल्याने संपूर्ण वसई तालुक्याला पावसाळ्यात पुराचा धोका निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वसई–विरार परिसरात अंदाजे ३३ ठिकाणी रॉयल्टी न काढताच माती भराव केला जात असल्याचे आढळून आले असून याबाबत स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी करूनही महसूल विभाग, वसई विरार शहर महानगरपालिका आणि पोलीस विभागाकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवनाच्या जागेत बेकायदा माती भराव रोखण्यासाठी दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे ससुनवघर, मालजीपाडा, बापाणे, जुचंद्र व चिंचोटी येथील वेगवेगळ्या ८३ ठिकाणी डेब्रीजचा भराव केलेबाबतची बाब खरी आहे. सदर ठिकाणी बेकायदेशीरपणे केलेल्या भरावाच्या अनुषंगाने ३३ प्रकरणी संबंधिताविरुद्ध तहसीलदार, वसई यांनी रु.२४०,५२,०७,९२२/- एवढ्या रकमेचे दंडात्मक आदेश पारित केले आहेत. तर प्रकरणी सुनावणीवर असून सुनावणीअंती संबंधितांनी दिलेला खुलासा व सादर केलेल्या पुराव्याची पडताळणी करून गुणवत्तेवर न्यायोचित आदेश पारित करण्याची कार्यवाही तहसीलदार, वसई यांच्या स्तरावर सुरू आहे.

(५) उक्त प्रकरणी पैकी १९ ठिकाणी कांदळवन (सरकारी व खाजगी) क्षेत्रात भराव केल्याचे आढळून आलेले आहे. अशा ०८ प्रकरणी भारतीय पर्यावरण सुरक्षा अधिनियम, १९८६ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हदगांव (जि.नांदेड) तालुक्यात अमृत सरोवर कामामधून निघालेला मुरूम लोहमार्ग आणि महामार्गाच्या कंत्राटदारांना पुरविण्यात येत असल्याबाबत

**(१०) * ९०५४ श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगांव (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात अमृत सरोवर (शेततळे) करुन त्यातील मुरुम विना मोबदला महसूल, जलसंधारण आणि रेल विकास निगमाच्या अधिकाऱ्यांच्या आर्थिक संगनमताने लोहमार्ग आणि महामार्गाच्या कंत्राटदारांना पुरविण्यात येत असल्याचे नुकतेच माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोहमार्ग बांधणीचे काम करणाऱ्या संबंधित कंपनीने अमृत सरोवर निर्मितीच्या कामामधून निघालेला मुरुम मोफत नेण्याची परवानगी जिल्हाधिकारी कार्यालयाने दिली असली तरीही सदर कंपनीकडून परवान्याचे उल्लंघन करुन हजारो ब्रास मुरुमाचे उत्खनन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शेतकऱ्यांच्या शेतात सरोवर तयार न करता माळरानाची, टेकड्याची जमीन पाहून अमृत सरोवर मंजूर करण्यात आले असून २ मीटर खोदकाम मर्यादा असतांना २० ते ३० मीटरपर्यंत खोदकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन मुरुम नेणाऱ्या कंपनीकडून दंड वसूल करण्यात यावा अशी मागणी लहुजी शक्ती सेनेच्यावतीने उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, हदगाव यांच्याकडे माहे मे, २०२५ मध्ये लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नांदेड जिल्हयातील हदगांव तालुक्यामध्ये Package-IV अंतर्गत यवतमाळ नांदेड या नवीन ब्रॉडगेज लाईन km.२०७ to २५३ चे कामासाठी रेल्वे विकास निगम लिमिटेड यंत्रणेमार्फत नियुक्त कंत्राटदार PMPL-RSVCPL JV, Hyderabad (Telangana) यांना केंद्र शासनाच्या आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत मौजे मनाठा येथील ग.नं. २९०, मौजे कवाना येथील ग.नं.१२, मौजे पांगरी येथील ग.नं.९७ व मौजे कार्ला येथील ग.नं.१४० मधील शेततळे निर्मितीस एकूण ४७,४०० ब्रास उत्खनन करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

(२) सदर कंपनीकडून परवान्याचे उल्लंघन करून हजारो ब्रास मुरूमाचे उत्खनन केले आहे अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) उक्त क्षेत्रामधील शेततळ्यांना ०१ ते ०८ मीटर पर्यंत खोली करीता परवानगी दिलेली आहे. २०-३० मीटर खोलीचे खोदकाम केल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) अशा प्रकारचे निवेदन संबंधित कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(५) उक्त क्षेत्रामध्ये केंद्र शासनाच्या आझादी का अमृत महोत्सव सरोवर अंतर्गत नवीन शेततळे निर्माण करून त्यामाध्यमातून उपलब्ध होणारा विनामुल्य मुरूम याबाबत देण्यात आलेल्या परवानगी आदेशाच्या सर्व उत्खनन स्थळांची ईटीएस मोजणी करण्याचे निर्देश दिलेले असून, मोजणीअंती संबंधित कत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त उत्खनन केल्याचे आढळून आल्यास त्याच्याकडून स्वामित्वधन वसूल करण्यात येईल.

-----------------

## राज्यात अनेक जिल्ह्यात शबरी आदिवासी घरकुल योजनेकरिताचे निधी वाटप विहित वेळेत करण्याबाबत

**(११) * ७१२२ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शंकर मांडेकर (भोर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना हक्काची घरे उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने १००% राज्य पुरस्कृत शबरी आदिवासी घरकुल योजना सन २०१२-१३ मध्ये सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेद्वारे घरकुल बांधकामासाठी शासनाने सन २०२१-२२ ते २०२४-२५ या कालावधीत दिलेला निधी व प्रत्यक्ष वितरण यांच्यात तफावत असल्याने लाखो आदिवासी कुटुंबांना हक्काची घरे मिळाली नसल्याचे आर्थिक पाहणी अहवालातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच घरकुल बांधण्यासाठी ग्रामीण भागाकरिता प्रति घरकुल अनुदान सर्वसाधारण क्षेत्रासाठी एक लाख वीस हजार रूपये तसेच नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी एक लाख तीस हजार रुपये इतके अनुदान असताना निधी वाटप योग्य वेळी होत नसल्याने अनेक आदिवासी बांधव घरांपासून वंचित असल्याची माहिती सर्व्हेक्षणादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या शबरी घरकुल योजनेसाठी निधी देण्याबाबत शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेसाठी निधी वाटप विहित वेळेत करण्याबाबत तसेच आदिवासी कुटुंबांना लवकरात लवकर हक्काची घरे मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

शबरी आदिवासी घरकुल योजनेतंर्गत (ग्रामीण) सन २०२१-२२ ते २०२४-२५ (माहे जून,२०२५) पर्यंत एकूण १८६२१८ घरकुले मंजूर करण्यात आली आहेत.

(३) शबरी आदिवासी घरकुल योजना केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येत असून सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार घरकुल हे लाभार्थ्याने स्वतः बांधणे अपेक्षित आहे. सदर योजनेतंर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाच्या टप्पानिहाय प्रगतीनुसार ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्यामार्फत आवास सॉफ्ट पोर्टलवर टप्पेनिहाय फोटो अपलोड केल्यानंतरच ऑनलाईन PFMS प्रणालीद्वारे एकूण चार टप्प्यात अनुदान सदर लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येते.

(४) हे खरे नाही.

शबरी आदिवासी घरकुल योजनेतंर्गत (ग्रामीण) सन २०२१-२२ ते २०२४-२५ पर्यंत आदिवासी विकास विभागामार्फत एकूण रू.२६३१७५.०० लक्ष इतका निधी राज्य व्यवस्थापन कक्षास वितरीत करण्यात आला आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील निगडी येथील दुय्यम निबंधकाने चुकीच्या पध्दतीने बेकायदा दस्त नोंदणी केल्याबाबत

**(१२) * १२०४३ श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील निगडी येथील हवेली क्र.२४ या दुय्यम निबंधक कार्यालयातील दुय्यम निबंधक यांनी खरेदी खत, बक्षीस पत्र व करारनामे यासारख्या दस्तांमधून मालमत्तेच्या मूल्यांकनापेक्षा कमी प्रमाणात मुद्रांक शुल्क तसेच नोंदणी फी भरून दस्त नोंदणी केल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवेली क्रमांक २४ या निगडी कार्यालयातील दुय्यम निबंधक यांनी चुकीच्या पद्धतीने बेकायदा दस्त नोंदणी केल्याच्या तक्रारी सहजिल्हा निबंधक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने निगडी दुय्यम निबंधक कार्यालयामधील दस्तांची तपासणी विशेष पथकाने केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सहजिल्हा निबंधक कार्यालयाच्या तपासणीत ५५ दस्तांमध्ये सुमारे तीन कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपयांचा मुद्रांक आणि नोंदणी फी बुडविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सह जिल्हा निबंधक पुणे शहर कार्यालयातील तपासणी पथकाने सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२४, पुणे शहर या कार्यालयाची तपासणी केली असता तपासणी अहवालात एकूण आक्षेपित ५५ दस्तांपैकी,

१. इतर अनियमितता केलेल्या दस्तांची संख्या १२ आहे.

२. तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करुन नोंदविण्यात आलेल्या दस्तांची संख्या ३४ आहे.

३. मुद्रांक शुल्क व नोंदणी फी कमी आकारलेल्या दस्तांची संख्या ०९ इतकी असून त्यामध्ये मुद्रांक शुल्क रु.३,१८,४१,६३०/ व नोंदणी फी रु.१,१३,०००/- असे एकूण रु.३,१९,६४,६३०/- बुडविल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) सदर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे यांच्या प्राप्त अहवालानुसार श्री.आर.एन.दोंदे, सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हवेली क्र.२४ यांना शासन आदेश दिनांक ६.५.२०२५ (म.नं) पासून निलंबित करण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वन विभागात बोगस व निकृष्ट कामे होत असून निधीचा गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(१३)** * **१००४८ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वन विभागात दरवर्षी रोपवने, रोपवाटिका, जल व मृद संधारण, वनातील प्रतिबंधात्मक योजना, वनातील इमारती तसेच पर्यावरणाच्या अनेक महत्त्वाकांशी योजनांवर शासनाकडून कोट्यवधींचा निधी खर्च केला जात असूनही बोगस निविदा प्रक्रिया राबवून निकृष्ट कामे करुन शासकीय निधीचा वापर करण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विभागातील काही अधिकाऱ्यांकडून सर्व शासकीय नियम व निकष डावलून कोट्यवधी रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार होत असून नागरी वस्तीपासून दूर असलेल्या वनांकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे वन विभागात बहुतांश कामे ही गैरव्यवहाराने होत असल्याने याबाबतची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी लोकप्रतीनिधिनी शासनाकडे केली होती, मात्र ही चौकशी करण्यास टाळाटाळ होत असून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात ठाणे वन विभागात झालेल्या गैरव्यवहाराबाबत पुराव्यासह सदर गैरव्यवहाराची तक्रार ही मुख्य वनसंरक्षक व उप वनसंरक्षण दक्षता व गुणनियंत्रण विभाग यांनी त्यांच्या स्तरावर चौकशी न करता ज्या विभागाच्या विरोधात तक्रार आहे त्या ठाणे वन विभागाकडे सदर प्रकरण चौकशीसाठी पाठविले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, वनविभागास जेव्हा तक्रार प्राप्त होते, तेव्हा सदर तक्रार अर्जावर संबंधित वनवृत्त कार्यालय व विभागीय कार्यालयामार्फत प्रचलित शासन कार्यपध्दतीप्रमाणे कार्यवाही करण्यात येते व तक्रारीत तथ्य आढळून आल्यास संबंधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ व इतर कायद्यातील तरतुदीनुसार उचित कार्यवाही करण्यात येते.
(४) हे खरे नाही.

ठाणे वनविभागाच्या संदर्भात मा.लोकप्रतिनाधींकडून अलीकडे तक्रार प्राप्त झाल्याचे निर्दशनास आलेले नाही. तथापि, एका खाजगी व्यक्तीकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय वनाधिकारी (दक्षता) यांचे अधिनस्त वनक्षेत्रपाल (संरक्षण व अतिक्रमण निर्मूलन) यांच्याद्वारे चौकशी करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## मौजे नाळवंडी व काळेगाव हवेली (ता.जि.बीड) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामात झालेला गैरव्यवहार

**(१४) * ९२८९ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नाळवंडी व काळेगाव हवेली (ता.जि.बीड) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना विभागातील अधिकाऱ्यांसमवेत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीमध्ये मनरेगा अंतर्गत पाणंद रस्ता खडीकरण व मजबुतीकरणाची दिनांक १४ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास रितसर पाहणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची प्रत्यक्ष कामाची पाहणी केली असता, रत्याचा निकृष्ट दर्जा, कागदोपत्री दुबारीकरण, मजुरांना कोणतीही कल्पना न देता कुशल व अकुशल देयके पारित करणे यासंदर्भात ग्रामस्थांच्यावतीने वारंवार तक्रार दाखल केली असून सदर तक्रार खरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच समितीने गटविकास अधिकारी (बीड) व तत्सम अधिकारी यांच्यासोबत संगनमत करुन कामाचा निकृष्ट दर्जेचा अहवाल अपूर्ण स्वरुपात घेवून सर्व व्यवस्थित असल्याचे दाखवुन तात्काळ कुशल निधीची देयके घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद (बीड) वा समकक्ष कार्यकारी अभियंता त्रयस्त समिती व गुणनियंत्रण विभागाच्यावतीने पाहणीसह कामाचा दर्जा, अंदाजपत्रकाप्रमाणे कामनिहाय माहिती, हजेरीपटानुसार मजुरांना दिलेले देयके तसेच कुशल देयके पारीत होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त देयके पारित होताना कंत्राटदाराचे आयकर प्रमाणपत्र, जीएसटी, लेखा परिक्षण अहवाल या बाबींची खातरजमा नियमोचीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १, ६ व १४ मे, २०२५ रोजी पत्राद्वारे मुख्य सचिव, सचिव (रोहयो) विभाग, आयुक्त नरेगा (नागपूर) आणि विभागीय आयुक्त (छत्रपती संभाजीनगर) यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच बोरफडी (ता.जि.बीड) या ग्रामपंचायतकडून विविध लेखाशिर्षा अंतर्गत बहुतांश कामांमध्ये दिरुक्ती झाल्याच्या तक्रारी प्राप्त असून जी कामे करण्यात आली ती कामे निकृष्ट दर्जाची करुन निधीचा अपव्यय केल्याबाबतच्या तक्रारी तसेच विविध विकास कामांची नियमोचीत स्तरनिहाय, संचिकानिहाय, लेखाशिर्ष निहाय, कामनिहाय, गुणनियंत्रण विभागाच्या तथा त्रयस्त समितीच्यावतीने सखोल चौकशीसह कार्यवाही प्रस्तावित करण्याची मागणीही स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन ग्रामस्थांनी केलेल्या रस्त्यांच्या तक्रारीबाबत तसेच सदरहू कामात अनियमितता, निकृष्ट दर्जा यावर दोषी अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्यासह कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) होय, हे खरे आहे.
(७) उप अभियंता, गेवराई, जि.बीड यांचेमार्फत कामाची पडताळणी (क्रॉस चेकिंग) करण्यात आली आहे. त्यानुसार कामे तांत्रिकदृष्ट्या योग्य झाली असून कामांचे मुल्यांकनदेखील योग्य असल्याचे अभिप्राय उपअभियंता यांनी दिले आहेत. त्यानुसार काही देयके अदा करण्यात आली आहेत.

तसेच जिल्हा स्तरावरुन कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बीड यांचेमार्फत देखील चौकशी करण्यात आली आहे. सदर कामे इतर योजनेतून झाली नसून मजुरांना त्यांची मजुरी बँक खात्यामध्ये प्राप्त झाली आहे व कामे अंदाजपत्रकानुसार तांत्रिकदृष्ट्या व भौतिकदृष्ट्या झाली असल्याचे नमूद करण्यात आली आहेत. तथापि, लोकप्रतिनिधींच्या पत्रास अनुसरुन नरेगा, आयुक्त नागपुर यांच्या निदेशानुसार विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत त्रीसदस्यीय तपासणी पथक गठीत करण्यात आले आहे. सदर पथकामार्फत कामांची चौकशी व पाहणी करण्यात येत आहे.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माळीण (जि.पुणे) गावात झालेल्या दुर्घटनेत वाचलेल्या २० कुटुंबांचे सर्व सोयी-सुविधांयुक्त कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याबाबत

**(१५) * ९०९५ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळीण (जि.पुणे) गावात माहे जुलै, २०१४ मध्ये झालेल्या दुर्घटनेत वाचलेल्या २० कुटुंबांचे पुनर्वसन वन विभागाने साखरमाची (जि.पुणे) येथे केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्वसन केलेल्या गावातील घरांमध्ये वीज, शाळा, वहिवाटीकरिता रस्ता, रोजगार व अन्य कोणत्याही सुविधा उपलब्ध नसल्याने सदर कुटुंबांवर उपासमारीची वेळ आल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पुनर्वसनाच्या खाजगी जागेचे भाडे वन विभागाने संबंधीत जागा मालकाला अद्यापही अदा केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर २० कुटुंबांचे सर्व सोयी-सुविधांयुक्त कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) व (२) माळीण सारखी भूस्खलनाची दुर्घटना टाळण्याकरीता भिमाशंकर अभयारण्यामुळे बाधित झालेल्या मौजे साखरमाची, ता.आंबेगाव, जि.पुणे या गावातील २० कुटुंबींयाची श्री.शंकर नारायण देसले यांचे मालकीच्या मौजे साजई, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील स.नं.३८ चे क्षेत्रावर तात्पुरत्या स्वरुपात निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आली होती.

याकरीता सदर जागेवर २० निवारा शेड, २ स्वच्छतागृह उभारण्याकरीता मदत व पुनर्वसन उप विभागाच्या दिनांक १९.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.४३.८२ लक्ष निधी देखील वितरित करण्यात आला होता.
(३) मौजे साखरमाची, ता.आंबेगाव, जि.पुणे या गावातील २० कुटुंबीयांच्या तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आलेल्या जागेचे भाडे, विजबिल, घरपट्टी अदा करण्याकरीता आवश्यक असलेली रक्कम रु. ७.९० लक्ष

वनक्षेत्रपाल, मुरबाड (पूर्व) यांचेकडे दिनांक १६.०६.२०२५ रोजी वळती करण्यात आली आहे.
(४) व (५) महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ मधील तरतुदींनुसार डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे कायमस्वरुपी पुनर्वसन करणे संदर्भात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचेमार्फत कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

-----------------

**राज्यात पापलेट माशांचे संवर्धन करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(१६) * ७१२६ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पदुम विभागाने मत्स्यसाठ्याचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने माशांच्या छोट्या पिल्ल्लांच्या मासेवारीवर निर्बंध घालण्यासाठी समुद्री मत्स्यकी संशोधन केंद्र (CMFRI) या विभागाने पापलेटसह ५८ माशांच्या किमान आकारमानांची शिफारस केली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच पालघरच्या सर्वच बंदरात माशांच्या लहान पिल्लांची बेसुमार हत्या होत असून महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अन्वये याप्रकरणी कारवाईचे कागदोपत्री आदेश काढले जात असले तरी त्याची अंमलबजावणी होताना दिसत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील तीन वर्षापासून पापलेट माशांच्या घटत्या संख्येची आकडेवारी चिंताजनक असून अशा लहान पिल्लांची मासेमारी करणाऱ्या एकाही मच्छीमाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात पावसाळी मासेमारी बंदीचा कालावधी केवळ दोन महिन्यांचा आहे. मात्र पापलेटच्या पिल्लांचा संवर्धनासाठी बंदी कालावधी दोन महिन्यांवरून तीन महिने करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पापलेटच्या प्रजनन आणि संगोपन क्षेत्रातील मासेमारीवरील बंदी व पर्ससीन नेटच्या नौकांवर निर्बंध घालून पापलेट माशाचे संवर्धन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) होय, हे खरे आहे.

सीएमएफआरआय (केंद्रीय समुद्री मत्स्यकी संशोधन केंद्र) यांनी केलेल्या शिफारसीनुसार महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारणा-२०२१) अंतर्गत दिनांक ०२/११/२०२३ शासन आदेशान्वये माशाच्या जातीनुसार किमान कायदेशीर आकारमान निश्चित केले आहे.
(२) हे, खरे नाही.

पापलेट माश्यांच्या पिल्लांची मासेमारी रोखण्यासाठी मच्छीमारांमध्ये जनजागृती करण्यासाठी मच्छीमारांना जिल्हा कार्यालयाकडून परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे. तसेच, मच्छीमार सहकारी संस्थांच्या बैठका घेऊन, लहान माशांची मासेमारी रोखण्यासाठीच्या उपाययोजना, कायद्यातील तरतूदी, शाश्वत मासेमारी टिकवून ठेवण्यासाठी करावयाचे सामूहिक प्रयत्न याबाबत मच्छीमारांना वेळोवेळी अवगत करण्यात येत आहे.
(३) हे, खरे नाही.

माहे एप्रिल, २०२५ मध्ये महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारणा २०२१) अंतर्गत स्थापन केलेल्या अंमलबजावणी पथकाद्वारे ठाणे जिल्ह्यातील जलधी क्षेत्रात तपासणी केली असता लहान आकाराचे पापलेट मासे आढळून आल्यामुळे, नौकेवर सागरी कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यात आली असून, रू.१.१७ लक्ष इतकी शास्ती लावण्यात आलेली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) पर्ससीन नेटव्दारे मासेमारी करण्यास दिनांक २७.०४.२०१८ च्या शासन अधिसूचनेअन्वये प्रतिबंध घालण्यात आला आहे. राज्यातील जलधी क्षेत्रात अनधिकृत पर्ससीन मासेमारी करणाऱ्या ३३९ मासेमारी नौकांवर सागरी कायद्यातर्गत कारवाई केली असून, त्यांच्यापासून रु.१,१६,४३,०००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वांगी (ता.कडेगांव, जि.सांगली) येथील निवासी शाळेच्या इमारतीची झालेली दुरवस्था**

**(१७) * ७८०० श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांगी (ता.कडेगांव, जि.सांगली) येथील अनुसूचित जातीतील मुलांच्या निवासी शाळेकडे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे इमारतीची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेच्या वर्गखोल्या व विद्यार्थी राहत असलेल्या खोल्यांना असलेल्या खिडक्यांच्या काचा फुटल्या असून इमारतीत गळतीही होत असून विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्यामुळे ती २०० वरुन ८७ वर आली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वांगी येथील निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार, राहणीमान, शिक्षण व आरोग्याच्या बाबतीत योग्य सुविधा मिळत नसल्याने याबाबतची तक्रार प्रशासनाकडे करुनही याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने येथील विद्यार्थी व नागरीकांकडून नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू निवासी शाळेची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना सर्व मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे अंशत: खरे आहे.

वांगी, ता.कडेगांव, जि.सांगली येथील अनुसूचित जातीतील मुलांच्या निवासी शाळेतील विद्यार्थ्यांच्या निवासी खोल्या व वर्गखोल्यांमधील खिडक्यांच्या फुटलेल्या काचांबाबत तसेच रंगरंगोटी व किरकोळ दुरुस्ती संबंधी अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कडेगांव, जि.सांगली यांचेमार्फत सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरीता वसतिगृह प्रवेश घेण्याची अंतिम मुदत ३१ जुलै पर्यंत असून वांगी, ता.कडेगांव, जि.सांगली येथील अनुसूचित जातीतील मुलांच्या निवासी शाळेत आतापर्यंत १२५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. १०० टक्के प्रवेश होण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना नियमानुसार सर्व मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या ३४ गावांतील गायरान व सरकारी जमिनींवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केल्याबाबत

**(१८) * ७५७२ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धायरी, किरकटवाडी, नांदेड, आंबेगाव, खडकवासला, नऱ्हे व नांदोशी (जि.पुणे) या गावातील गायरान व सरकारी जमिनींवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अतिक्रमणामुळे पाणी योजना, स्वच्छतागृहे, आरोग्य केंद्रे व कचरा प्रकल्प यांसारख्या सार्वजनिक विकासकामांसाठी जागा उपलब्ध होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अतिक्रमणे सरकारी व गायरान जमिनीवर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींनी करून बनावट कागदपत्रांच्या आधारे जमीन बळकाविल्याचे तसेच त्यावर टपऱ्या, गाळे, हॉल बांधून दारू व्यवसाय सुरु करुन गोठे, बनावट संस्था व अनधिकृत इतर बांधकामे केली असून झाडांची बेसुमार कत्तल केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अतिक्रमण रोखण्यासाठी सरकारी जमिनींची सीमारेषा निश्चित करणे, कंपाऊंड उभारणे आणि विद्युत पुरवठा खंडित करणे याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत तसेच यातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सरकारी व गायरान जमिनी बनावट कागदपत्रांच्या आधारे बळकाविल्याची बाब खरी नाही. तथापि, मौजे आंबेगाव, मौजे किरकटवाडी, मौजे धायरी येथील काही क्षेत्रावर अतिक्रमण असलेचे दिसून येते.
(४) व (५) मा.उच्च न्यायालयाकडील जनहित याचिका क्र. ५४/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १७/०४/२०२४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सरकारी व गायरान जमिनीवरील अतिक्रमणे स्थानिक स्वराज्य संस्थेने निष्कासित करणे कामी अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांनी दिनांक २५/०४/२०२४ रोजी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने हवेली तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी तसेच आयुक्त पुणे महानगरपालिका यांना कार्यवाही करणे कामी दिनांक १४/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तथापि, ज्या शासकीय जमिनी पुणे महानगरपालिकेकडे देखभालीसाठी सुपूर्द करण्यात आलेल्या आहेत. त्यावरील अतिक्रमणांना प्रतिबंध करणेची जबाबदारी पुणे महानगरपालिकेची आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये अनेक ठिकाणी असलेल्या कांदळवनात डेब्रिजचा भरणा सुरू असल्याबाबत

**(१९) * ९५८० श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय**

**देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (मढ बेट) येथील कांदळवनात डेब्रिजचा भरणा सुरु आहे तसेच वडाळा येथे कांदळवनाच्या जमिनीवर भूमाफीयांनी मातीचा भराव टाकून कब्जा केलेल्या जमिनीचा वापर व्यवसायासाठी करत असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच गोरेगाव पहाडी गाव (मुंबई) येथील पाणथळ जमीन तसेच सभोवताली कांदळवन क्षेत्र असलेल्या जवळपास ४७२ एकर जमिनीवर डेब्रिज व भराव टाकून अतिक्रमण केल्याने काही जणांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व कारणांमुळे मुंबईतील विविध भागांतील शेकडो ट्रक डेब्रिज उक्त ठिकाणी टाकल्यामुळे कांदळवनांचे नुकसान होऊन मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे कांदळवनात अवैध पार्किंग, लग्नाचा ओपन हॉल बांधण्यात आल्याचे तसेच स्थानिक भूमाफियांनी घेतलेल्या पार्किंगमधील सर्वच वाहनांचे फोटो व नंबर घेण्याचा आदेश देत सी.एस २१० व सी.एस ६ भूखंडाच्या मोजमापास सुरुवात केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुसार डेब्रिज भरणा प्रकरणी संबंधित दोषींविरुद्ध कारवाई करुन अतिक्रमित जागा शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत तसेच सदर पाणथळ जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे

(२) होय

(३) अंशत: खरे आहे

(४) अंशत: खरे आहे

(५) मालाड (मढ बेट) येथील कांदळवनात डेब्रिजचा भरणा सुरु असल्याबाबत निदर्शनास आलेले नाही तथापि वडाळा येथील न.भु.क्र.११७ या जागेवरील अनधिकृत बांधकाम दिनांक २५.६.२०२५ रोजी निष्कासित करण्यात आलेले आहे तसेच मौजे पहाडी, गोरेगांव येथील सर्व्हे क्र. १६१ पै. या खाजगी मिळकतीवर कांदळवनापासून ५० मीटरच्या आत डेब्रिज भरणे, अतिक्रमण झाल्याने संबंधिताविरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम १५ (१) (२) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कांदळवन क्षेत्रामध्ये अतिक्रमण होऊ नये यासाठी कांदळवन संरक्षक भिंत बांधण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्याबाबत

**(२०) * ७८७४ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्यामार्फत केवळ ३२४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरित करण्यात आली असून उर्वरित ६४५ विद्यार्थी अद्याप शिष्यवृत्तीपासून वंचित असल्यामुळे विद्यार्थ्यांनी संस्थेच्या कार्यालयात उपोषण केल्याचे माहे एप्रिल २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF) २०२१ व २०२२ च्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ नोंदणी दिनांकापासून १०० टक्के दराने अधिछात्रवृत्ती सरसकट मंजूर करण्यासंदर्भातील निवेदन शासनाकडे दिनांक ५ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शासनाने ५१५ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली असली तरी सदर रक्कम मागील तीन वर्षांच्या प्रलंबित शिष्यवृत्तीसाठी वापरता येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले असून सारथी संस्थेकडे सध्या शिष्यवृत्ती वितरित करण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे संस्थेने शासनाकडे ११८ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विद्यार्थ्यांनी आपले सहामाही अहवाल, कागदपत्रे, संस्थात्मक प्रक्रियेतील सर्व अटी पूर्ण करूनही शिष्यवृत्ती न मिळाल्यामुळे त्यांचे संशोधन रखडले आहे, यामुळे संबंधित अभ्यासक्रम, विद्यापीठांतील प्रगती व गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रक्रियेतील विलंबामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, मानसिक तणाव व संशोधनमधील व्यत्यय यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, यामुळे शासनाने त्वरित निधी वितरित करून विद्यार्थ्यांच्या हितासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्यामार्फत छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती-२०२३ च्या ९६९ विद्यार्थ्यांपैकी ८०० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती अदा करण्यात आली आहे. उर्वरित १६९ विद्यार्थ्यांचे अर्ज अपूर्ण असल्याचे आढळून आल्याने त्यांना अद्याप अधिछात्रवृत्ती अदा करण्यात आलेली नाही.

(२) याबाबत व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास (सारथी), पुणे यांच्या दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२४ च्या पत्रान्वये सारथी संशोधक विद्यार्थी कृती समितीची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्यामार्फत मार्च २०२५ पर्यंत सन २०१९ ते २०२३ या बॅचमधील सर्व पात्र संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीकरीता निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच चालू आर्थिक वर्षात प्राप्त मागणी व आर्थिक तरतूद विचारात घेऊन निधी वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) हद्दीतील रस्त्यांसाठी संपादित केलेल्या जमीनीचे सातबारा उताऱ्यावरुन क्षेत्र कमी करण्याबाबत

**(२१) * ११०११ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) हद्दीतील शेतगट क्र. ५२/अ/१/१ मधील शेतजमीन मुखेड ते मुक्रमाबाद रस्त्यासाठी संपादित करुनही सातबारा उताऱ्यावरील शेतजमीन कमी करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुखेड गट क्र.५२ मधील क्षेत्र २.३४ हे. आर जमीन मुखेड ते मुक्रमाबाद रस्त्यांसाठी संपादित झाल्याबाबत फेरफार क्र.२८७१/२ अन्वये फेर मंजूर असून तत्कालीन मंडळ अधिकारी व तलाठी यांनी जमीन कमी करण्याची नोंद सातबारा उताऱ्यावर न करता त्यावर इतर अधिकाऱ्यांची नोंद घेतल्याने संपादित जमिनीची फेर विक्री झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात रस्त्यासाठी संपादित झालेल्या जमीनीचे सातबारा उताऱ्यावरुन क्षेत्र कमी करण्यात यावे, असे लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार संबंधित प्रकरणात दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) प्रकरणी, उपअधीक्षक, भूमी अभिलेख, मुखेड यांना मोजणी नकाशा व अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले असून सदर प्रकरणी अहवाल प्राप्त होताच त्यानुसार यथोचित नोंदी घेण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक जिल्ह्यांत वारंवार होत असलेल्या वन्यप्राण्यांच्या मृत्यूबाबत

**(२२) * ७२३३ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यात विविध वनक्षेत्रांमध्ये २५ वाघांचा नैसर्गिक कारणांमुळे, रेल्वेच्या धडकेने व शिकार केली असल्याने बिबट्यांचा व इतर वन्यप्राण्यांचा मृत्यू झाल्याची नोंद वन विभागाने जाहीर केली असल्याचे माहे जानेवारी ते एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानवी हस्तक्षेपामुळे वन्यप्राणी जंगलाबाहेर पडत असल्यामुळे वन्यजीव संरक्षणाला मोठा धोका निर्माण झाला असून त्याचा परिणाम जैवविविधतेच्या समतोलावरही होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन्यप्राण्यांमुळे अनेक जिल्ह्यांत नागरिकांचाही मृत्यू झाल्याच्या घटना होत असून स्थानिक नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होऊन महिला व शेतकरी जंगल लगतच्या क्षेत्रात जात नसल्याचे निदर्शनास

आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२४ या कालावधीत राज्यात एकूण किती वाघांचा मृत्यू झाला त्याची चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन राज्यात वारंवार होत असलेल्या वन्यप्राण्यांचा मृत्यूबाबत तसेच सन २०२२-२०२४ या कालावधीत राज्यात एकूण किती वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) माहे जानेवारी ते एप्रिल, २०२५ या कालावधीत राज्यामध्ये नैसर्गिक कारणामुळे-१३, विजेच्या धक्क्यामुळे-४, रस्ता, रेल्वे व विहिर अपघात-४ व अज्ञात कारणामुळे -१ असे एकूण २२ वाघांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

नैसर्गिक कारणाने-८, रस्ता, रेल्वे व विहिर अपघात-२०, शिकार-३, व अज्ञात कारणामुळे-९ हे बिबट असे एकूण ४० बिबट्यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच माहे जानेवारी ते एप्रिल, २०२५ या कालावधीत नैसर्गिक कारणामुळे-२३, विजेच्या धक्क्यामुळे-४, शिकार-४, रस्ता कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे व विहिर अपघात-२४ व अज्ञात कारणामुळे-६ असे एकूण ६१ इतर वन्यप्राण्यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) वन विभागामार्फत वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे करण्यात येणारे प्रभावीपणे संवर्धन यामुळे वन्यप्राण्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

वन्यप्राण्यांच्या वाढत्या संख्येमुळे सदर वन्यप्राणी त्यांचे नैसर्गिक अधिवासाच्या शोधात स्थलांतर करीत असतात सदर प्रक्रियेमुळे जैवविविधता समतोल साधला जातो.

(३) माहे जानेवारी ते एप्रिल, २०२५ या कालावधीत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात २१ व्यक्तींचा मृत्यू झाल्याच्या घटना निदर्शनास आली आहेत.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतुदींचा अवलंब करुन मानवी जिवितास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.

वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही अधिक प्रभावीपणे पारपाडण्याकरीता महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ दिनांक ३०.०१.२०२४ पासून अस्तित्वात आला असून त्यातील तरतूदींनुसार आवश्यक कार्यवाही करुन संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(४) माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२४ या कालावधीत विविध कारणाने १०७ वाघांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणांमध्ये प्रचलित नियमातील तरतूदींचा अवलंब करुन चौकशी करण्यात येते.

(५) व (६) सन २०२२ ते २०२४ या कालावधीत राज्यात एकूण ७०७ वन्यप्राण्यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

वन्यप्राण्यांच्या संरक्षणार्थ क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/ बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते.
- विद्युत प्रवाहामुळे वाघांचे व अन्य वन्य प्राण्यांचे मृत्यू होऊ नये म्हणून वनविभाग व म.रा.वि.वि. महामंडळ मिळून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांद्वारे सनियंत्रण करण्यात येते.

- अवैध शिकाऱ्यांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कार्यवाही करण्यात येते. त्यासाठी गुप्त सेवा निधीचा वापर करण्यात येतो.
- विशेष व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गत सुध्दा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते. M-Stripes प्रणाली असलेल्या मोबाईलचा पुरवठा क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना करण्यात आला असून त्याद्वारे संशयास्पद गतीविधींवर लक्ष ठेवण्यात येते.
- अतिसंवेदनशिल क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी, निरीक्षण मनोरे व तपासणी नाके तयार करण्यात आले आहेत.
- मेळघाट व्याघ्र प्रकल्पात तयार करण्यात आलेल्या सायबर सेलच्या माध्यमातून शिकारीच्या घटनांमधील आरोपींचा शोध घेण्यात येतो.
- वन विभागातील अतिक्रमण, वन्यप्राण्यांची शिकार, वनवणवा इत्यादी गुन्ह्यांची माहिती प्राप्त होण्याकरीता १९२६ हा हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वयीत करण्यात आला आहे.

-----------------

## राज्यात "बळीराजा" शेत व पाणंद रस्ते योजना या योजनांचा शासन निर्णय काढून निधी देण्याबाबत

**(२३) * ८७२८ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर) (शिरोळ), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (वैजापूर), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.हिकमत उढाण (घनसावंगी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात ग्रामीण भागासाठी असलेल्या पाणंद रस्त्यांसाठी मुख्यमंत्री पाणंद रस्ते, मातोश्री पाणंद रस्ते योजनेची घोषणा केली मात्र रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून दोन हजार किलोमीटरचे रस्ते करण्यात आले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासह शेतकऱ्याला शेती पूरक व्यवसाय करण्यास फायदेशीर असणारी ही योजना वर्षानुवर्षे दुर्लक्षित झाल्याने तसेच पाणंद रस्ते तयार करण्यासाठी स्वतंत्र निधीची गरज असतानाही शासन आवश्यक निधी देत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "बळीराजा" शेत व पाणंद रस्ते योजना दिनांक १० मार्च, २०२५ रोजी नावाने जाहीर करण्यात येऊन देखील या योजनेचा शासन निर्णय प्रसिद्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ व दक्षिण सोलापूर तालुक्यात या योजनेंतर्गत शेत पाणंद रस्ते व सिमेंट कॉंक्रीट रस्ते मंजूर करण्यात आले असून उक्त योजनेत बदल केला जात असल्याकारणाने अनेक रस्ते मंजूर

असतानाही तसेच वाशिम जिल्ह्यातील अडोळी, तोंडगाव, तामसी, उकळीपेन आदी जिल्हा परिषद गटातील पाणंद रस्त्यांसाठी निधी मिळत नसल्याने केवळ प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ते अद्याप प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेचा शासन निर्णय काढण्याबाबत तसेच या योजनेतील रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेसंदर्भातील प्रस्तावावर ग्रामविकास विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे मिटमिटा (ता.देवगिरी, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील अप्पर तहसीलदार यांच्यावर लाचलूचपत प्रतिबंधात्मक विभागामार्फत करण्यात आलेली कारवाई

**(२४)** * **११६८८ श्री.विलास भुमरे (पैठण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मिटमिटा (ता. देवगिरी, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील श्री.साहेब नसीर खान यांच्या नावे असलेल्या गट नंबर १५८ मधील प्लॉट नंबर १६१ हा शेख अझरुद्दीन सिराजुद्दीन यांच्याकडून खरेदी केलेले क्षेत्र दुरुस्तीच्या कामासाठी जिल्ह्याचे अप्पर तहसीलदार श्री.निलेश गर्जे यांच्याकडे देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अप्पर तहसीलदार यांचा सहकारी श्री.नितीन चव्हाण व श्री.साहिल जुबेर बहाशवन यांना अप्पर तहसीलदार यांच्या नावे लाच घेत असताना पकडले असल्याचे दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात जिल्ह्याचे अप्पर तहसीलदार श्री.निलेश गर्जे यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभागामार्फत कारवाई करण्यात आली होती, परंतु आत्तापर्यत अप्पर तहसीलदार त्याच ठिकाणी कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, खरे आहे.

अर्जदार सैफ खान नासेर खान यांनी तलाठी सजा, मिटमिटा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांचेकडे विनंती अर्ज सादर करुन मौ.मिटमिटा येथील ग.न.१५८ मधील प्लॉट नं.१६१ चे क्षेत्र नोंदणीकृत खरेदीखतानुसार दुरुस्ती करणेबाबत विनंती केली होती.

तलाठी सजा, मिटमिटा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १२.१२.२०२४ रोजी अर्जदार यांचा अर्ज व प्रकरणातील अहवालासह प्रस्ताव अपर तहसीलदार, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे नियम, १५५ नुसार दुरुस्तीसाठी सादर केला होता.

(२) होय, खरे आहे.

पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचा अहवाल दिनांक १६.०५.२०२५ अन्वये श्री.नितीन गर्जे, अपर तहसीलदार, छत्रपती संभाजीनगर, श्री.नितीन चव्हाण व श्री.सोहेल जुबेर बहाशवन यांचेविरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे.

(३) हे खरे नाही.

गुन्हा घडल्यापासून श्री.नितीन गर्जे, अपर तहसीलदार, छत्रपती संभाजीनगर या पदावर हजर झालेले नाही. त्यामुळे अपर तहसीलदार, छत्रपती संभाजीनगर पदाचा अतिरिक्त पदभार विभागीय आयुक्त कार्यालयाचे आदेश दिनांक २२.०५.२०२५ अन्वये श्री.परेश चौधरी, नायब तहसीलदार यांना सोपविण्यात आलेला आहे.

(४) श्री.नितीन गर्जे, अपर तहसीलदार, छत्रपती संभाजीनगर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७ अ, १२ अन्वये पोलीस स्टेशन, सिटी चौक, छत्रपती संभाजीनगर येथे गु.रं.न.२०१/२०२५ अन्वये गुन्हा दाखल झाल्याने श्री.नितीन गर्जे, अपर तहसीलदार यांना शासन आदेश दिनांक १३.०६.२०२५ अन्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे व शासनपत्र दिनांक १६.०६.२०२५ अन्वये त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यामध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोकरा) अनुदान वितरित केलेल्या घटकांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२५) * १२२९९ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यामध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोकरा) अनुदान वितरणात शेडनेट उभारणीगृह, अवजारे बँक, गोडाऊन, कृषीमाल वाहतूक वाहन, आयशर इ. घटकांच्या अंमलबजावणीमध्ये तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी पुरवठादार यांच्याशी संगनमत करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटकांची चौकशी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर व लातूर विभागातील १८ तपासणी पथके स्थापन करुन १५ दिवसांमध्ये अहवाल सादर करण्याचे आदेश देऊनही संबंधित अधिकाऱ्यांकडून अद्यापही तपासणी अहवाल सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी पोकरा योजनेमध्ये अनुदान वितरित करण्यात आलेल्या घटकांमध्ये झालेल्या गैरव्यवहारांची व आजतागायत पुराव्यानिशी दाखल केलेल्या तक्रारींची सखोल चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी जालना जिल्ह्यात दक्षता पथक / विशेष पथकामार्फत धडक मोहिम राबवून लेखापरिक्षणासह १०० टक्के तपासणी करण्याबाबत शासन पत्र दिनांक ३०/१०/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. यानुषंगाने सखोल तपासणी करण्यासाठी दक्षता पथक कृषी आयुक्तालयामार्फत छत्रपती संभाजीनगर व लातूर विभागातील गट-अ संवर्गातील अधिकारी यांची पथके स्थापन करण्यात आली असून, जालना जिल्ह्यातील ३२५८ शेडनेटपैकी १६६५ शेडनेटची तपासणी पूर्ण झाली आहे. उर्वरित शेडनेटची तपासणी विभागीय कृषी सह संचालक, छत्रपती

संभाजीनगर यांचे कार्यालयामार्फत सुरु आहे.

(३) सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजनेंतर्गत जालना उप विभागांतील तालुक्यांमध्ये शेडनेट हाऊस या घटकांची अंमलबजावणी करतांना मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होऊन झालेल्या अनियमितेबाबत संबंधितांविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव कृषि आयुक्तालय, पुणे यांनी दिनांक ३०/०८/२०२४ रोजी सादर केला आहे. सदर प्रकरणी कृषि आयुक्तालयाच्या प्रस्तावानुसार प्रकरणातील एका अधिकाऱ्याला दिनांक २३/०९/२०२४ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच संबंधित अपचारी अधिकाऱ्यांविरुध्द दिनांक २३/०९/२०२४ च्या शासन ज्ञापन व आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या नियम ८ खाली दोषारोपपत्र बजावून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात पर्ससीन तसेच एलईडी प्रकाशझोताने होणाऱ्या मासेमारीला बंदी असतानाही विनापरवाना मासेमारी होत असल्याबाबत

**(२६) * ९८६६ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात १२ सागरी मैलांपर्यंतच्या जलधीक्षेत्रात पर्ससीन तसेच एलईडी प्रकाशझोताने होणाऱ्या विनाशक मासेमारीला पूर्णत: बंदी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचे अनुदानित डिझेल वापरून पर्ससीन आणि एलईडी यंत्रणा असलेल्या भांडवलदारांच्या बोटी बंदीक्षेत्र तथा बंदीक्षेत्राच्या पलीकडील सागरी हद्दींमध्ये विनापरवाना मासेमारी करीत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये कोळी युवाशक्ती संघटनेने मत्स्यविकास व बंदरे मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात मच्छीमार बोटींना शासनाचा अनुदानित डिझेल कोटा मंजूर करताना संबंधीत बोटींवर पर्ससीन आणि एलईडी यंत्रणा अधिष्ठापित नसल्याची स्थानिक परवाना अधिकारी आणि मत्स्यक्षेत्र निरीक्षक यांच्यामार्फत खात्री करूनच डिझेल कोटा मंजूर करण्याची मागणीही संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोट्यवधी रुपयांचा डिझेलचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) होय,हे खरे आहे.

(२) व (३) होय असे निवेदन प्राप्त आहे.

डिझेल कोटा मंजूरीसाठी आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयास प्रस्तावित करण्यापूर्वी अवैध मासेमारी सामग्री व उपसाधने न वापरता मासेमारी करीत असल्याबाबतची जिल्हास्तरावरुन पडताळणी करुन खातरजमा केली जाते. त्यानुसार सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी प्रमाणित करुन सागरी जिल्हा कार्यालयामार्फत डिझेल कोटयाचा प्रस्ताव सादर करण्यांत येतो.

प्रत्यक्षात तपासणी करण्यांत आलेल्या, विधीग्राहय, वैधता असलेले विमा व मासेमारी परवाना धारक मच्छीमार नौका मालक सभासदांच्या डिझेल प्रतिपूर्ती प्रस्तावाची छाननी होऊन, प्रतिपूर्तीची देय व मंजूर झालेली संपूर्ण रक्कम सर्व निकषांची, नियमांची, सूचनांची पूर्तता झाली असल्यास, रितसर संबंधीत पात्र नौकां मालकांच्या बँक खात्यात VPDA प्रणाली अंतर्गत DBT द्वारे जमा करण्यांत येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे खरीवली (ता.वाडा, जि.पालघर) येथून गेलेल्या रिलायन्स गॅस पाईपलाईनलगत ब्लास्टींग करून मोठया प्रमाणात उत्खनन केल्याबाबत**

**(२७) * ७३१४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खरीवली (ता.वाडा, जि.पालघर) येथून गेलेल्या रिलायन्स गॅस पाईपलाईनलगत श्री. महेश काशिनाथ जाधव यांची क्रशर मशीन असून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ब्लास्टींगद्वारे मोठ्या प्रमाणात गौणखनिज उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीनुसार मंडळ अधिकारी यांनी पंचनामा करून याबाबतचा अहवाल तहसीलदार, वाडा यांना पाठविला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची नाममात्र रॉयल्टी भरल्याचे दाखवून करोडो रूपयांची रॉयल्टी बुडवून बेकायदेशीर उत्खनन केल्याचे आरोप असतानादेखील पोलिसांत तक्रार दाखल करताना तहसीलदार, वाडा यांनी ज्यांच्याविरोधात तक्रार होती त्यांची नावे वगळली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे या एफआयआरमधून वगळण्यात आलेल्या दोघांवर देखील कारवाई करुन, बुडविलेली रॉयल्टी वसूल करण्याबाबत व तहसीलदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) स्थानिक ग्रामस्थ यांच्या दिनांक २०.०२.२०२५ व व्यवस्थापक रिलायन्स इथेन गॅस लाईन यांचा दिनांक १४.०३.२०२५ च्या अर्जाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी यांनी दिनांक १२.०३.२०२५ प्रत्यक्ष स्थळपाहणी व चौकशी करुन तहसिलदार यांना अहवाल सादर केला, त्याअनुषंगाने संबंधिता विरुद्ध पोलिस स्टेशन, वाडा येथे गु.र.क्र ०११४/२०२५, दिनांक १४.०३.२०२५ रोजी पैट्रोलियम आणि खनिज वाहक नळ (जमीन वापरण्याचे हक्क संपादन करणे, अधिनियम, १९६२ चे कलम १५, खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ चे कलम २१, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ आणि भारतीय न्याय संहिता (बी एन एस) २०२३ चे कलम २८७ व ३(५) अन्वये संबंधिताविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने पोलीस निरिक्षक, वाडा यांचेकडून चौकशी अंती अहवालातील संबंधित व्यक्तीचे नाव गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आले आहे.

(४) व (५) अशा प्रकारचे निवेदन संबंधित कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळून आले आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही करून अहवाल सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, कोकण यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांना दिल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे कृषी आयुक्तालयामधील दक्षता पथकाचे प्रमुख यांनी शेतकऱ्यांचे अनुदान स्वत:च्या खात्यात वर्ग करुन केलेला अपहार

**(२८) * १०९११ श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी आयुक्तालयाच्या दक्षता पथकाचे प्रमुख असलेले श्री.गोविंद मोरे, अधीक्षक (SAO) यांनी शेतकऱ्यांचे अनुदान थेट स्वतःच्याच बँक खात्यावर वर्ग केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षता पथकाचे प्रमुख श्री.मोरे यांनी उपविभागीय कृषी अधिकारी असताना देखील शेतकऱ्यांच्या अनुदानाचा निधी घेतला तरीही त्यांची नियुक्ती दक्षता पथकाच्या प्रमुख पदी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तत्कालीन उपविभागीय कृषि अधिकारी श्री.मोरे यांनी हिंगणघाट व राजुरा येथे कार्यरत असताना मृद व जलसंधारणाची कामे करण्याकरीता निविदा प्रक्रियेत घोळ करून ओळखीच्या कंत्राटदारांना नियमबाह्य पद्धतीने व निविदा प्रक्रिया मॅनेज करुन कामांचे वाटप करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे मा.कृषी मंत्री महोदय यांचे कार्यालय, प्रधान सचिव (कृषी) तसेच आयुक्त कृषी कार्यालयात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दक्षता पथक श्री.मोरे यांनी त्यांचे कृषी उपसंचालक व तंत्र अधिकारी यांनी तत्कालीन आयुक्त कृषी यांना चुकीची माहिती देऊन महाराष्ट्रातील सर्व गुणवत्ता नियंत्रण निरीक्षण अधिकारी यांची चौकशी सुरु केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या प्राथमिक अहवालानुसार श्री.मोरे यांचा गैरव्यवहारात सहभाग असल्याचे निदर्शनास आल्यानंतरही त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शेतकऱ्यांचा निधी वेगवेगळया माध्यमातून घेण्याच्या अनेक क्लुप्त्या कृषी अधिकारी राज्यभरात राबवत आहेत, तसेच कृषी आयुक्तालय आणि इतर अधिकारी एकमेकांना सहकार्य करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. माणिकराव कोकाटे :** (१) सदर विषयाच्या अनुषंगाने कृषी आयुक्तालयास तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) हे खरे नाही, तक्रार प्राप्त होण्यापूर्वीच श्री.मोरे यांची दक्षता पथकाच्या प्रमुख पदी पदोन्नतीने पदस्थापना झालेली आहे.

(३) हे खरे आहे. सदर विषयान्वये तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही. चौकशीमध्ये कोणताही अडथळा येऊ नये यास्तव, श्री.मोरे यांची अकार्यकारी पदावर बदली करण्यात आलेली आहे.

(६) हे खरे नाही.

(७) श्री.मोरे तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी हिंगणघाट या पदावर कार्यरत असताना केलेल्या गैरव्यवहार प्रकरणी चौकशी सुरु असून चौकशी अंती योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

तसेच, श्री.मोरे तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी, राजुरा या पदावर कार्यरत असताना केलेल्या गैरव्यवहार प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशीची कार्यवाही कार्यान्वित करण्यात आली आहे.

तद्नुषंगाने, श्री.मोरे यांच्याकडे असलेला अधीक्षक कृषी अधिकरी, दक्षता पथक, कृषी आयुक्तालय पुणे या पदाचा पदभार काढण्यात आला असून चौकशीमध्ये कोणताही अडथळा येऊ नये यास्तव, श्री.मोरे यांची अकार्यकारी पदावर बदली करण्यात आलेली आहे, विलंब झालेला नाही.

-----------------

**नवरगाव (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथे वन विभागाने बांधलेला बंधारा वाहून गेल्याबाबत**

**(२९) * ७०७९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवरगाव (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथे वन विभागाने बांधलेला बंधारा एका महिन्यात वाहून गेल्याची घटना माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर बंधाऱ्यांचे काम गुणवत्तापूर्वक न करता अनेक ठिकाणी बंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे वन विभागाच्या कार्यप्रणालीवर साशंकता निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी वन विभागाने शेतकऱ्यांना व जनावरांना फायदा होईल अशा ठिकाणी बंधारा व्यवस्थित बांधला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन बंधारा योग्य ठिकाणी बांधला गेला नसल्यामुळे तसेच सदर बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने बंधारा तुटून येथील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली असून शासनाचे लाखो रुपये वाया गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बंधाऱ्यांचे निकृष्ट काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच योग्य ठिकाणी व चांगल्या दर्जाचा बंधारा बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

सदर कामाची प्रत्यक्ष पंचासमक्ष मौका तपासणी करण्यात आली, त्यानुसार सदरहु सिमेंट बंधारा सुस्थितीत दिसुन आला.

(२) हे खरे नाही.

वनविभागाने प्रचलित मापदंडानुसार बंधाऱ्याचे बांधकाम गुणवत्तापूर्वक केलेले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

सदर बंधारा जंगलातील नाल्याजवळ योग्य ठिकाणी बांधल्यामुळे वन्यप्राणी व पशुपक्षी यांना फायदा होत आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत असल्याबाबत**

**(३०) * ७३३७ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढ होत असल्याचे तसेच विदर्भ व मराठवाडा या दोन विभागात माहे मार्च, २०२५ मध्ये सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळ, अतिवृष्टी व पिकांचे होणारे नुकसान इ. अनेक कारणामुळे शेतकरी कर्जबाजारी होत असल्याने मोठ्या प्रमाणात आत्महत्या होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच माहे मे, २००६ मध्ये न्यायमूर्ती चंद्रचूड आणि न्या.क्षितीज व्यास यांच्या खंडपीठाने शेतकऱ्यांची किंवा त्यांच्या कुटुंबातील कुणीही आत्महत्या केली तर ती शेतकरी आत्महत्या समजण्यात येऊन त्याकरिता जिल्हास्तरावर समित्या नेमून त्वरित निर्णय घेऊन एका महिन्याच्या आत एक लाख रुपये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या आत्महत्येनंतर त्यांच्या नातेवाईकांना नियमानुसार आर्थिक मदत काही कारणामुळे दिली जात नसल्याबाबत मा.मदत व पुनर्वसन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २० एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनामार्फत वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत व्यक्तीला देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीच्या धर्तीवर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणे, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे तसेच कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) मराठवाडा व विदर्भ मध्ये मार्च २०२५ दरम्यान २५० शेतकरी आत्महत्येची प्रकरणे निदर्शनास आली असून त्यापैकी १०२ प्रकरणे शासन निर्णयाच्या निकषानुसार पात्र ठरले असून ६२ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. तसेच ८६ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. पात्र १०२ प्रकरणांपैकी ७७ प्रकरणी मदत देण्यात आलेली आहे. उर्वरित प्रकरणी मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक२३.१.२००६ अन्वये नापिकी, राष्ट्रीयकृत बँक/सहाकारी बँक किंवा मान्यता प्राप्त सावकराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज

परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे आत्महत्या घडली असल्यास पात्र प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रू.१.०० लक्ष इतकी मदत देय आहे.

(३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक२७.०२.२००६ अन्वये मृत व्यक्तिंच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शेतजमिन धारण करित असेल तर सदर व्यक्तीस शेतकरी म्हणून गृहित धरण्यात यावे. तसेच पात्र ठरलेल्या प्रकरणी वारसांना नियमानुसार १ लाख रूपये मदत देण्यात येते.

(४) शेतकरी आत्महत्या घडल्यानंतर तात्काळ सदर कुटुंबास जिल्हास्तरीय अधिकारी / कर्मचारी यांचेकडून भेट दिली जाते व त्यानंतर तालुकास्तरीय समितीकडून आवश्यक ती चौकशी करण्यात येऊन परिपूर्ण प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीकडून पात्र, अपात्र निर्णय घेऊन तात्काळ शासन निर्णयानुसार मदत देण्यात येत आहे. तसेच राज्यात माहे एप्रिल-२०२५ दरम्यान २२९ शेतकरी आत्महत्येची प्रकरणे निदर्शनास आली असून, त्यापैकी ७४ प्रकरणे शासन निर्णयाच्या निकषानुसार पात्र ठरले असून ३१ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. तसेच १२४ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. पात्र ७४ प्रकरणांपैकी ३३ प्रकरणी मदत देण्यात आलेली आहे. उर्वरित प्रकरणी मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत व्यक्तींच्या वारसांना मिळणाऱ्या मदतीच्या धर्तीवर शेतकरी आत्महत्या प्रकरणांतील कुटुंबियांना वाढीव मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही.

(६) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासन स्तरावरून खालीलप्रमाणे विविध विभागामार्फत उपाययोजना करण्यात येतात.

• नैसर्गिक आपत्तीमुळे पिक नुकसान झाल्यास, मदत व पुनर्वसन कडून पीक नुकसानीबाबत मदत देण्यात येते.

• कृषी विभागामार्फत शासन परिपत्रक दिनांक ०४.०२.२०१९ अन्वये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत रु.६,०००/- आणि शासन निर्णय दिनांक १५.०६.२०२३ अन्वये नमो शेतकरी महासन्मान निधीअंतर्गत रु.६,०००/- असे एकूण रु.१२,०००/- वार्षिक अनुदान देण्यात येत आहे.

• आत्महत्या रोखण्याकरीता शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य भाव मिळणे, सिंचन सोई मध्ये वाढ करणे व समुदपदेशन केंद्रे संचलित करणे इ. योजना जिल्हा स्तरावर राबविण्यात येत आहेत.

• शासन निर्णय दिनांक २४.०७.२०१५ अन्वये विविध विभागामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येतात.

• आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांसाठी शासकीय योजनांचा लाभ मिळणेबाबत शासन निर्णय दिनांक१८.०६.२०१९ अन्वये विविध विभागाकडून लाभ देण्यात येतात.

-----------------

**राज्यातील मच्छीमार बोटींना करमुक्त डिझेल कोटा मिळण्याबाबत**

**(३१) * ९९८२ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मच्छीमार नौकांची मुदतीत तपासणी न झालेल्या व संस्थांनी नौकांचा परिपूर्ण तपासणी अहवाल मुदतीत सादर न केल्याने खोल समुद्रातील मासेमारी करणाऱ्या १३९ मच्छीमार सहकारी संस्थांचे सदस्य असलेल्या मच्छीमार बोटींना करमुक्त डिझेल कोटाच मिळणार नसल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर सिंधुदुर्ग व रत्नागिरी या सागरी जिल्ह्यांतील ३५०० मच्छीमार बोटी करमुक्त डिझेल कोट्यापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मच्छीमार नौकांची तपासणी वेळेत पूर्ण करणे शक्य होत नसून तपासणी दरम्यान अनेक नौका मासेमारीसाठी १० ते १५ दिवस समुद्रात जात असल्यामुळे अशा नौकांची तपासणी करण्यात अडचणी येतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्वच संस्थेकडे नोंदणीकृत मच्छीमार नौकांना करमुक्त डिझेल कोटा मंजूर करावा, अशी विनंती करंजा मच्छीमार संस्थेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मच्छीमारांचे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने शासनाने सर्वच नौकांना करमुक्त डिझेल कोटा मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) हे खरे नाही,

माहे मार्च, २०२५ मध्ये सन २०२५-२६ करीता राज्यातील सर्व सागरी जिल्ह्यातील प्राप्त प्रस्तावांनुसार १३८ मच्छीमार सहकारी संस्थांच्या परवाना/विमा विधिग्राह्य असलेल्या तरोच प्रत्यक्ष तपासणी केलेल्या ७७९६ मासेमार यांत्रिक नौकांचा दिनांक ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ या कालावधीकरीता त्यांना आवश्यक असणाऱ्या वार्षिक डिझेल कोटा (जून व जुलै हे मासेमारी बंदी कालावधी वगळून) अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२) हे, खरे नाही.

माहे मार्च, २०२५ मध्ये सन २०२५-२६ करीता राज्यातील सर्व सागरी जिल्ह्यातील प्राप्त प्रस्तावांनुसार १३८ मच्छीमार सहकारी संस्थांच्या परवाना/विमा विधिग्राह्य असलेल्या तसेच प्रत्यक्ष तपासणी केलेल्या ७७९६ मासेमार यांत्रिक नौकांना डिझेल कोटा मंजूर करण्यात आला आहे.

(३) हे, खरे नाही.

मच्छीमार सहकारी संस्थांच्या परवाना/विमा विधिग्राह्य असलेल्या तसेच प्रत्यक्ष तपासणी केलेल्या ७७९६ मासेमार यांत्रिक नौकांचा डिझेल कोटा मंजूर करण्यात आला आहे.

(४) हे, खरे नाही.

अशी मागणी निवेदन आढळून आले नाही.

(५) माहे मार्च, २०२५ मध्ये सन २०२५-२६ - करीता राज्यातील सर्व सागरी जिल्ह्यातील प्राप्त - प्रस्तावांनुसार १३८ मच्छीमार सहकारी संस्थांच्या - परवाना/विमा विधिग्राह्य असलेल्या तरोच प्रत्यक्ष तपासणी केलेल्या ७७९६ मासेमार यांत्रिक नौकांचा दिनांक ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ या कालावधी करीता त्यांना आवश्यक असणाऱ्या वार्षिक डिझेल कोटा (जून व जुलै हे मासेमारी बंदी कालावधी वगळून) अटी व शर्तीच्या अधिन राहुन मान्यता प्रदान करण्यांत आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यातील अवैध वाळू उत्खनन व घरकुल योजनांबाबत

**(३२) * ७०८२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम**

**(पलूस कडेगाव), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय देरकर (वणी), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.श्याम खोडे (वाशिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (वैजापूर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील घरकुल लाभार्थ्यांसाठी ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू उपलब्ध करून देण्याचा व नदी, खाडीपात्रातील रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन विक्री (डेपो पद्धती) ऐवजी लिलाव पद्धतीने करण्यात येणार असल्याचे धोरण निश्चित करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैधरित्या वाळू उपसा व वाढीव दराने विक्री होत असल्यामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान झाले असून विविध आवास योजनांना माफक दरात मुबलक वाळू पुरवठा होण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदीपात्रातून अवैध वाळू उपसा व वाहतूक होत असताना जप्त करण्यात आलेली वाहने पुन्हा वाळू तस्करी व वाहतूक करीत असून त्यात अनेक नागरिकांचा मृत्यू झाला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच लिलावाद्वारे उत्खनन करण्यात येणाऱ्या प्रत्येक वाळू गटामधील १० टक्के वाळू विविध घरकुल लाभार्थ्यासाठी ५ ब्रासपर्यंत मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच वाळू टंचाईमुळे लाभार्थ्यांना मंजूर घरांचे बांधकाम वेळेत होऊ न शकल्यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाच्या नियोजनातील त्रृटी, वाळू पुरवठा व्यवस्थेतील अपयश, टेंडर प्रक्रिया व अधिकृत वाळू उपसास्थळी पुरेशा प्रमाणात वाळू उपलब्ध न होणे या अनेक कारणांमुळे घरकुल बांधकामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या सर्व प्रकरणांची चौकशी करुन दोषी कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्यासह अवैध वाळू उपसा, वाहतूक यावर नियंत्रण आणून नागरिकांना व विविध घरकुल आवास योजनांना मुबलक व माफक दराने वाळू उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

दिनांक ०८.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वाळू रेती निर्गती धोरण-२०२५ निर्गमित केले असून त्या अन्वये पूर्वीचे शासनामार्फत वाळू/रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्रीबाबतचे धोरण अधिक्रमित केले आहे. नवीन धोरणानुसार पर्यावरण अनुमतीप्राप्त नदी/खाडी पात्रातील वाळू गटांसाठी लिलावाद्वारे निर्गती करण्याची पद्धत अवलंबिण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

तथापि, जाफ्राबाद तालुक्यातील पासोडी शिवारात भारज-पासोडी रस्त्यावर पुलाच्या बांधकामासाठी लागणाऱ्या वाळूचा अवैध पुरवठा करणाऱ्या वाहनामुळे पाच मजुर मृत्यू पावले आहेत. सदर प्रकरणातील टिप्पर/हायवा हे जप्त करण्यात आले असून पोलीस ठाणे, जाफ्राबाद येथे FIR No.६५/२०२५ दिनांक २२.०५.२०२५ अन्वये वाहनचालक, वाहनमालक व ठेकेदार यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन मा.न्यायालयात प्रकरण चालू आहे.

(४) हे खरे आहे.

सदर धोरणान्वये लिलावधारक यांना त्यांनी उत्खनन केलेल्या वाळूच्या जास्तीत जास्त १० टक्के वाळू प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलांकरीता विनामूल्य उपलब्ध करुन देणे बंधनकारक केले आहे.

तसेच, स्थानिक वापरासाठी राखीव ठेवलेल्या वाळू गटामधून व जे वाळूगट लिलावामध्ये गेलेले नाही अशा नदी, नाले, ओढे इत्यादी मधील वाळूगटामधून स्थानिक वापरासाठी व घरकुलांसाठी वाळू उपलब्ध करुन देण्याची तरतूद दिनांक ०८.०४.२०२५ व दिनांक ३०.०४.२०२५ च्या वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ मध्ये केली आहे.

(५) व (६) हे खरे नाही,

तथापि, दिनांक ०८.०४.२०२५ व दिनांक ३०.०४.२०२५ च्या वाळू/रेती निर्गती धोरणानुसार जवळपास १,१८,९१५ घरकुल लाभार्थींना ४,४४,७८७ ब्रास वाळू विनामुल्य उपलब्ध करुन दिली आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, दिनांक ०१.०४.२०२५ ते दिनांक ३१.०५.२०२५ या कालावधीमध्ये राज्यामध्ये एकूण १८२० अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी रु.८५.३२ कोटी दंडाची आकारणी करण्यात येऊन २१५ गुन्हे दाखल करुन ९०७ वाहने जप्त केली आहेत. तसेच, ४१ आरोपी अटक करुन १ प्रकरणी एम.पी.डी.ए कायद्यानुसार तर ३ प्रकरणी मोक्का कायद्यानुसार कारवाई केली आहे.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**मुंबई.** **सचिव-१,**

**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.